शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
परिपत्रक

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

महोदय/महोदया,

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम ५६ (च) अन्वये विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयात कमवा व शिका योजना संदर्भातील मार्गदर्शक सुचना (नियमावली) तयार करण्यात आलेली असून सदर नियमावली सोबत जोडली आहे. त्यास अनुसरुन आपल्या महाविद्यालयात सदर मार्गदर्शक सुचना (नियमावली) अवलोकनी घेवून कमवा शिका योजना ही योजना सुरु करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल डॉ. आप्पासाहेब पवार विद्यार्थी भवन, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर या विभागाकडे तात्काळ पाठवावा.

कळावे,

आदेशान्वये

(श्री. व्ही. एस. सोयम)
उपकुलसचिव

सोबत - वरीलप्रमाणे.
संदर्भ क्र. संलग्नता/टी-२/ 471
दि. 06 DEC 2019

d:\2019\mangutkar\circular.docx

# शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर

**अधिक्षेत्रातील सर्व संलग्न महाविद्यालय मान्यता प्राप्त संस्था व शैक्षणिक संस्था – पातळीवर राबविली जाणारी 'कमवा आणि शिका' योजना**

## नियमावली

## प्रस्तावना :–

आर्थिक अडचणीमुळे कोणत्याही विद्यार्थ्याचे शिक्षण थांबू नये, या भूमिकेतून शिवाजी विद्यापीठाने 1968–69 सालापासून डॉ. आप्पासाहेब पवार विद्यार्थी भवन अंतर्गत ' कमवा आणि शिका ' ही योजना अंमलात आणली ती आजही विद्यापीठात सुरु आहे. याच धर्तीवर महाराष्ट्र विद्यापीठ कायदा 2016 नुसार शिवाजी विद्यापीठ संलग्नीत महाविद्यालयात कमवा आणि शिका ही योजना कार्यान्वीत व्हावी असा विद्यापीठाचा मानस आहे. या योजनेच्या माध्यमातून गरीब व होतकरु मुलांचे शिक्षण घेण्याचे स्वप्न साकारण्याचा प्रयत्न विद्यापीठ करीत आहे. अशा विद्यार्थ्यांना शिकत असताना निवडक स्वरूपाच्या कामाची संधी उपलब्ध करून देवून त्याबदल्यात प्रवेशित विद्यार्थी / विद्यार्थीनींना मेहनतान्याच्या मोबदल्यात राहण्याची, जेवणाची सोय करावी तसेच त्यांची संपूर्ण प्रवेश आणि परीक्षा फी माफ केली जावी किंवा वरिलप्रमाणे सोय करणे शक्य नसल्यास कमवा आणि शिका या योजनेखाली प्रवेशित असलेल्या विद्यार्थी / विद्यार्थीनींना प्रत्यक्ष कामाच्या मोबदल्यात मेहनताना अदा करण्यात यावा. यामागील उददेश एकच आहे की खरोखरच गरीब व होतकरु मुले / मुली शिक्षणापासून वंचीत राहू नयेत.

## योजनेची अंमलबजावणी :– सदर योजनेची अंमलबजावणी करीत असताना पुढील बाबींचा विचार करण्यात यावा.

**अ) विद्यार्थ्यांची निवडः–**

'कमवा व शिका' योजनेच्या प्रवेशा संदर्भातील विस्तृत सूचना संपूर्ण माहितीसह महाविद्यालयाच्या सूचना फलकावर किंवा महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी. इच्छुक सर्व विद्यार्थ्यांकडून विहित नमुन्यातील अर्ज, पुढील सर्व आवश्यक त्या कागदपत्रांसह भरुन घ्यावेत व छानननी समितीमार्फत छाननी करावी. यासाठी महाविद्यालयाच्या पातळीवर स्वतंत्र अशी छाननी समिती गठीत करण्यात यावी. क्षमतेपेक्षा जास्तीचे अर्ज प्राप्त झाल्यास सर्व विद्यार्थ्यांची प्रत्यक्ष तोंडी मुलाखत घेवून निवड यादी व प्रतिक्षा यादी तयार करण्यात यावी व त्यानुसार प्राधान्याने प्रवेश प्रक्रिया पूर्ण करावी.

**आवश्यक कागदपत्रे –**

1. तहसीलदारांचा गतसालातील उत्पन्नाचा दाखला ( सत्यप्रत करुन देणे )
2. रहिवाशी दाखला
3. प्राचार्य किंवा संबंधीत महाविद्यालयाच्या किंवा विद्यापीठातील प्राध्यापकांचे शिफारस पत्र.

4. दोन प्रतिष्ठित नागरिकांची शिफारस पत्रे ( सरपंच, पोलीस पाटील इ. )

5. जातीचा दाखला

6. वैद्यकीय दाखला ( फिटनेस सर्टिफिकेट )

7. गुणपत्रिकेची छायांकित प्रत

8. महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या पावतीची छायांकित प्रत

9. दोन ओळखपत्र आकाराचे फोटो.

10. विहीत नमुन्यातील प्रवेश अर्ज. (प्रवेश अर्ज जोडपत्र –अ )

**ब) योजनेकरीता पात्रता :–**

**1.** सदर योजनेचा लाभ फक्त पदवी/पदव्युत्तर नियमित शिक्षण घेणा–या व मागील वर्षी उतीर्ण झालेल्या गरीब व गरजू विद्यार्थ्यांना देण्यात येईल. तसेच सदर योजनेचा लाभ हा पुढील निकष धारण करणा--या विद्यार्थ्यांना मिळणार नाही.

अ. आंतरवासियता ( Internship )

ब. दुस–या देशात वास्तव्य असलेले ( Non Resident Indian – NRI)

क. परराज्यातून आलेले ( Other than Maharashtra State – OMS )

2. विद्यार्थ्यास भारत सरकार/शासनाकडून किंवा अन्य संस्थेकडून शिक्षणासाठी शिष्यवृत्ती , फेलाशिप शुल्क परतावा, फी सवलत किंवा इतर काही अनुदान मिळत असले तरी देखील असे विद्यार्थी प्रवेशास पात्र असतील.

3. ज्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न सर्वात कमी आहे अशा विद्यार्थ्यांना प्रथम प्राधान्याने प्रवेश देण्यात यावेत.

**क) कमवा आणि शिका योजनेच्या लाभार्थी विद्यार्थ्यांकडून भरुन घ्यावयाचा अर्ज –**

सदर योजनेच्या लाभार्थी विद्यार्थ्यांकडून कमवा आणि शिका योजनेचा कशाप्रकारे फायदा झाला याबाबतचा विद्यार्थ्याचा अभिप्राय ( फिडबॅक ) फॉर्म विद्यार्थ्याकडून भरुन घेण्यात यावा.

## ड) प्रवेश क्षमता व कालावधी :–

सदर योजनेमध्ये देण्यात येणारे प्रवेश हे पदवी ( नियमित ) अभ्यासक्रमाकरीता तीन वर्षे व पदव्युत्तर ( नियमित ) अभ्यासक्रमाकरीता दोन वर्षे असून प्रवेश क्षमता ही संबंधित महाविद्यालयाने निश्चित करावी.

प्रवेशित असलेल्या विद्यार्थ्यांपैकी जे विद्यार्थी सतत गैरहजर असतील किंवा जे विद्यार्थी अनुतीर्ण झालेले असतील अशा विद्यार्थ्यांचा प्रवेश रदद् करुन त्या जागी प्रतीक्षा यादीमधील विद्यार्थी प्रवेशास पात्र असतील.

## ई) 'कमवा व शिका ' योजने अंतर्गत करावयाची कामेः–

सर्वसाधारणपणे 'कमवा व शिका' योजनेत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना खालीलप्रमाणे कामे करावी लागतील. परंतू स्थानिक परिस्थितीनुसार महाविद्यालय विकास समितीच्या ( CDC ) च्या मान्यतेनुसार इतर कामाचा समावेश करता येईल.

1. कार्यालयीन कामे – प्रशासकीय विभाग, महाविद्यालय ग्रंथालय, वित्त विभाग, परीक्षा विभाग, प्रयोगशाळा सहाय्यक इत्यादी.
2. तांत्रिक कामे – टंकलेखन, संगणकावरील कामे, झेरॉक्स मशीन व अन्य तांत्रिक कामे.
3. फिल्ड वर्क – महाविद्यालयात असलेल्या बागेची निगा राखणे, परिसरातील झाडांची निगा राखणे, खेळाची मैदाने तयार करणे व त्याची निगा राखणे, महाविद्यालय परिसर स्वच्छ करणे, नर्सरी युनिट तयार करणे, गांडुळ खत प्रकल्प राबविणे, इत्यादी.

## उ) कामाचे तासः–

'कमवा व शिका' योजनेत काम करणा'–या विद्यार्थ्यांना पुढीलप्रमाणे काम देण्यात यावे.

1. कार्यालयीन कामकाज करणा–या विद्यार्थ्यांना रोज तीन तास काम देता येईल. कार्यालयास/महाविद्यालयास सुटट्ी असेल त्या दिवशी काम देण्यात येवू नये.
2. फिल्ड वर्क करणा–या विद्यार्थ्यांना तीन तास किंवा प्रत्यक्ष कामाच्या प्रमाणात प्रत्यक्ष कामाचे तास असतील मात्र ते सहा तासांपेक्षा जास्त असता कामा नये.
3. सर्व कमवा व शिका योजनेतील विद्यार्थ्यांचे कामाच्या ठिकाणचे स्वतंत्र हजेरीपत्रक ठेवण्यात यावे.

## ऊ) 'कमवा व शिका' योजनेच्या कामाचे मानधन/मोबदला :–

डॉ. आपासाहेब पवार विद्यार्थी भवन संचलित कमवा आणि शिका योजना व विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालयातील ' कमवा आणि शिका ' योजनेत सहभागी होणा–या विद्यार्थ्यांचा मेहनताना प्रती तास कमीत कमी रु. 30 प्रमाणे असावा.

1. विद्यापीठात सदर योजनेच्या विद्यार्थ्याची राहणे व जेवणाची सोय डॉ. आप्पासाहेब पवार विद्यार्थी भवन येथे केली जात असल्याने त्यांचा मोबदला डॉ. आप्पासाहेब पवार विद्यार्थी भवनकडे वर्ग केला जातो. यामध्ये विद्यार्थ्यांची संपूर्ण शैक्षणिक व परीक्षा फी माफ केली जाते.
2. ज्या महाविद्यालयात कमवा व शिका योजनें अंतर्गत काम करणा–या विद्यार्थ्यांची राहणे व जेवणाची सोय केली जाईल अशा महाविद्यालयांनी संपूर्ण वर्षाची शैक्षणिकपरीक्षा फी माफ करुन विद्यार्थ्यांना द्यावयाचा मोबदला महाविद्यालयाकडे वर्ग करुन घेण्यात यावा. परीक्षा फी माफ करणे म्हणजे विद्यापीठात परीक्षा फी न भरणे असे नसून ती परीक्षा फी महाविद्यालयाने भरावयाची आहे.
3. तसेच ज्या महाविद्यालयात कमवा व शिका योजने अंतर्गत काम करणा–या विद्यार्थ्यांची राहणे व जेवणाची सोय केली जाणार नाही अशा विद्यार्थ्याच्या मोबदल्यातून महाविद्यालयाची संपूर्ण वर्षाची शैक्षणिक व परीक्षा फी वजा करुन उर्वरित रक्कम सर्व संबंधीत विद्यार्थ्याना अदा करण्यात यावी. अशा विद्यार्थ्यांच्या मेहनताना मिळाल्याबाबत हजेरीपत्रकावर स्वाक्षरी घेण्यात यावी.
4. म्हाविद्यालयाने विना अनुदानित कोर्सेसच्या बाबतीत अनुदानीत कोर्सेस इतकीच शैक्षणिक व परीक्षा फी माफ करावी.

## ए) हजेरीपत्रक :

कमवा व शिका' योजनेमध्ये निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या यादीनुसार विद्यार्थ्यांचे मासिक हजेरीपत्रक तयार करावे. सदर हजेरीपत्रक, सोबत दिलेल्या विहीत नमुन्याप्रमाणेच असणे आवश्यक आहे. ( हजेरी पत्रक नमुना " ब " ) हजेरीपत्रकामध्ये उपस्थितीबाबत प्रत्येक दिवशी विद्यार्थ्यांची स्वाक्षरी असणे आवश्यक आहे. गैरहजर असलेल्या दिवशी अनुपस्थित असा शेरा असावा. उपस्थितीबाबत लेखा जोखा रजिस्टर ठेवण्यात यावे. यामध्ये मासिक प्रत्यक्ष कामाचे तास व प्रत्यक्षात विद्यार्थ्यांनी केलेले

काम याचा आढावा घेवून वार्षिक जमा खर्चाचा मेळ घालण्यात यावा. जे विद्यार्थी प्रमाणापेक्षा कमी तास काम करतील अशा विद्यार्थ्यांकडून कमी तासांचा मोबदला प्रती तास रु 30/- प्रमाणे भरुन घेण्यात यावा. जे विद्यार्थी प्रमाणापेक्षा जास्त तास काम करतील त्यांचा जादा कामाचा मोबदला प्रती तास रु 30/- प्रमाणे संबंधीत विद्यार्थ्यांना अदा करण्यात यावा.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा 2016 कलम 56 (च) अन्वये व दिनांक 27 मार्च, 2018 रोजी झालेल्या अधिसभेचा विषय क्र. 11 वरील शिफारस व दिनांक 14/12/2018 च्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीतील विषय क्र. 8 अन्वये झालेल्या ठरावाच्या अनुषंगाने शिवाजी विद्यापीठ संलग्नीत सर्व महाविद्यालयाने 'कमवा व शिका' ही योजना राबविणे गरजेचे असून त्यापासून गरीब व होतकरु विद्यार्थी त्यांच्या हक्काच्या शिक्षणापासून वंचीत राहणार नाहीत, ही भावना व उददेश यामागे असून सर्व महाविद्यालयांनी ही योजना आपल्या महाविद्यालयात राबवावी असे आवाहन शिवाजी विद्यापीठाच्या वतीने करण्यात येत आहे.

नमुना अर्ज – अ

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## ——————————————महाविद्यालय

### कमवा आणि शिका योजनेखाली प्रवेश मिळण्यासाठी करावयाचा प्रवेश अर्ज

प्रति,
मा. प्राचार्य / प्राचार्या,
——————————————
——————————————

फोटो

महोदय / महोदया,

मी खाली सही करणार ——————————————सध्या रा. ——————————————महाविद्यालयाच्या —————————— विद्याशाखेच्या पदवी / पदव्युत्तर अभ्यासक्रमास —————— या वर्गात प्रवेश घेतला असून महाविद्यालय संचलीत कमवा आणि शिका योजनेत प्रवेश घेवू इच्छीतो / इच्छीते. माझ्या विषयीची आवश्यक ती माहिती खालील नमुन्यात भरुन देत आहे.

मी प्रतिज्ञेवर सांगतो / सांगते की सोबत भरुन दिलेली माहिती संपूर्ण खरी आहे.

स्थळ :–

दिनांक :–

विद्यार्थी / विद्यार्थीनी सही /–

1. अ) विद्यार्थ्याचे / विद्यार्थीनीचे नाव : ..............................

   ब) पालकांचे नांव : ..............................

   क) पालकाशी नाते : ..............................

   ड) कायमचा पत्ता : ..............................

   ..............................

   इ) आधार कंमाक : ..............................

   ई) मोबाईल / फोन नंबर ..............................

2. तुम्हास ओळखणा–या दोन प्रतिष्ठीत व्यक्तींची प्रशस्तीपत्रे जोडली : आहेत / नाहीत

3. उत्पन्नाचे मार्ग :

   अ) शेती (एकूण किती शेती) : ..............................

   ब) नोकरी (हुद्दा पगार) : ..............................

   क) इतर व्यवसाय (कोणता व उत्पन्न) : ..............................

   ड) उत्पन्नाचा दाखला जोडला : आहे / नाही

4. उत्तीर्ण केलेली शेवटची परीक्षा : अ. टक्केवारी (शेवटच्या वर्षाची) : ......................

क. टक्केवारी (तिन्ही वर्षाची) : ......................

5. सध्या मिळणा–या व यापूर्वी मिळालेल्या शैक्षणिक सवलती, शिष्यवृत्ती इ. याबाबतची माहिती :

अ) सवलतीचे नाव , स्वरुप व मिळणारी रक्कम : ..........................................................................................

6. श्रमदानात भाग घेतला होता काय? होय / नाही

अ) असल्यास कोणत्या महाविद्यालयातून :..........................................................................................

ब) कोणत्या वर्षी व किती दिवस : ..........................................................................................

क) पूर्वीचे शिक्षण श्रमदान योजनेतून घेतले होते काय? होय / नाही

असल्यास दाखला जोडावा.

7. रोजंदारी अथवा इतर प्रकारे काम केले आहे काय? असल्यास तपशील जोडावा.

खाली नमूद केलेल्या कामा पैकी आपण कोणती कामे केली आहेत. असल्यास त्याबाबतचा दाखला जोडावा.

( कमवा व शिका योजनेत श्रमदान करणे आवश्यक असल्याने सदरची माहिती अत्यावश्यक आहे.)

1) शेती : ..........................................................................................

2) संगणक : ..........................................................................................

3) कॅन्टीन / हॉटेलमध्ये काम : ..........................................................................................

4) भोजनालय : ..........................................................................................

5) ग्रंथालयातील कामाबाबत : ..........................................................................................

6) फिल्ड वर्क / इतर (गवंडीकाम, सुतारकाम, इलेक्टीककाम इ,) : ..........................................................................................

8. इतर कौशल्ये : वक्तृत्व, लेखन, क्रीडा , सामाजिक कार्य इत्यादी. (दाखला जोडावा.)

## प्रतिज्ञापत्र

1) विद्यार्थी भवनच्या व प्रशासकीय नियमाचे माझ्याकडून पालन होईल. वेळोवेळी होणारे प्रशासकीय बदल मला मान्य असतील.

2) कामासंबंधी माझ्याबद्दल तक्रार झालेस माझा विद्यार्थी भवन मधील प्रवेश रद्द होतो याची मला जाणीव आहे.

3) आर्थिक व्यवहार विद्यापीठाच्या / महाविद्यालयाच्या नियमानुसार करण्यास मी बांधील राहीन.

4) परीक्षा कालावधीत अभ्यासासाठी घेतलेल्या सुट्टीतील कामाचे तास भरुन देईन.

5) पुर्व परवानगी शिवाय मी रजा घेणार नाही.

6) महाविद्यालयाच्या / भवनच्या लेखी परवानगीशिवाय बाहेरील कोणतेही अर्थाजनाचे मी काम करणार नाही.

7) विद्यापीठ / महाविद्यालय प्रशासनाने घेतलेल्या निर्णयाशी मी बांधील राहील.

विद्यार्थ्यांची / विद्यार्थीनीची सही

हजेरी पत्रक नमुना – "ब"

महाविद्यालयाचे नांव :– ————————————————————————

कमवा आणि शिका योजना – सन 2019–20

कमवा आणि शिका योजने अंतर्गत विभाग व अधिविभागामध्ये केलेल्या कामाचा अहवाल

| विद्यार्थी / विद्यार्थीनीचे नांव – | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| कामाचे ठिकाण – | | | | | |
| कामाचा कालावधी – | | | | | |
| अ.क्र. | दिनांक | कामाचा तपशिल | कामाची वेळ | एकूण तास | विद्यार्थ्याची सही |
| 01 | | | | | |
| 02 | | | | | |
| 03 | | | | | |
| 04 | | | | | |
| 05 | | | | | |
| 06 | | | | | |
| 07 | | | | | |
| 08 | | | | | |
| 09 | | | | | |
| 10 | | | | | |
| 11 | | | | | |
| 12 | | | | | |
| 13 | | | | | |
| 14 | | | | | |
| 15 | | | | | |
| 16 | | | | | |
| 17 | | | | | |
| 18 | | | | | |
| 19 | | | | | |
| 20 | | | | | |
| 21 | | | | | |
| 22 | | | | | |
| 23 | | | | | |
| 24 | | | | | |
| 25 | | | | | |
| 26 | | | | | |
| 27 | | | | | |
| 28 | | | | | |
| 29 | | | | | |
| 30 | | | | | |
| 31 | | | | | |

दिनांक :– विद्यार्थ्यांची सही विभागप्रमुखांची सही